



dainiklokaarambh@gmail.com

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १६ जानेवारी २०२५ | अंक ३८ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# मुले नायलॉन मांजाने पतंग उडवताय? थेट पालकांवर कारवाई, १४ जणांना अटक

संक्रातीला सर्वत्र पतंग उडवली जाते. परंतु पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजाला बंदी घातली आहे. कारण नायलॉन मांजामुळे पक्षीच नव्हे तर मानवाचाही मृत्यू झाल्याचे प्रकार घडले आहे. नाशिक शहरात नायलॉन मांजाने एका युवकाचा बळी गेला. त्यानंतर नाशिक पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत. इमारतीच्या टेरेसवर जाऊन नायलॉन मांजा वापरणा-या विरोधात पोलिसांनी ही धडक कारवाई केली आहे. नायलॉन मांजा वापरणा-यांना देखील ताब्यात घेतले आहे. तसेच नाशिक शहरात नायलॉन मांजा वापर करणा-या अल्पवयीन मुलांच्या १४ पालकांना अटक केली आहे. नायलॉन मांजामुळे मृत्यू होत असल्याची दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने



घेतली. या प्रकरणी कायदा करण्याचे निर्देश न्यायालयाने सरकारला दिले. नाशिकमध्ये ५४ गुन्हे दाखलनाशिकम ध्ये मांजा वापरणा-यावर तीन दिवसांत विविध पोलीस ठाण्यात ५४ गुन्हे दाखल झाले आहे. तसेच एकूण ७०आरोपींना ताब्यात घेतले आहे. जे मुले अल्पवयीन आहेत, त्यांच्या पालकांवर कारवाई करण्यात आली आहे. आरोपींच्या विरोधात जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. नाशिक शहरातून १४ लाख २४ हजारांचा मांजा पोलिसांनी हस्तगत केला आहे. नाशिक शहर पोलिसांनी केलेल्या कारवाईत नायलॉन आणि पांडा मांजा वापर करणा-यांवर कारवाई केल्याची माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी दिली. जळगावात थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा जळगावम ध्ये नायलॉन मांजाची विक्री करणे तसेच बाळगल्या प्रकरणी तीन जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हे दाखल करण्यात आला आहे. नायलॉन मांजामुळे जिल्ह्यांमध्ये दुर्घटना घडत असल्याने जळगाव जिल्हा पोलीस दल ॲक्शन मोडवर आले आहे. नायलॉन मांजा बाळगून पतंग उडवताना अल्पवयीन मुलगा आढळून आल्यास त्याच्या पालकांवर गुन्हा दाखल केला

### ड्रोन कॅमेराचा वापर

नायलॉन मांजामुळे दुर्घटना घडू नये यासाठी जळगाव शहरात पहिल्यांदाच पोलीस दलाच्या वतीने ड्रोन कॅमेराच्या माध्यमातून नजर ठेवली जात आहे. मकर संक्रांती मुळे पतंग उडवण्याचे प्रमाण जास्त असल्याने ड्रोन कॅम-याच्या माध्यमातून पहिल्यांदाच लक्ष ठेवले जात आहे.

## या गोष्टी माझ्यासाठी मॅटर करत नाही, बीड प्रकरणी पंकजा मुंडे असं का म्हणाल्या?





बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला एक महिना उलटला आहे. या हत्या प्रकरणातील मास्टरमाईड असलेल्या वाल्मिक कराडला ७ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावण्यात आली आहे. वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानंतर कराड समर्थक आक्रमक झाले. त्यांनी अनेक ठिकाणी गोंधळ घालण्यास सुरुवात केली आहे. संतोष देशमुख यांच्या समर्थकांना न्याय मिळायला हवा, वाल्मिक कराडला शिक्षा झालीच पाहिजे, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तर दुसरीकडे मात्र या जिल्ह्याच्या मंत्री असलेल्या पंकजा मुंडे यांनी मात्र या प्रकरणातून स्वत:ला लांब ठेवल्याचे पाहायला मिळत आहे.पंकजा मुंडे यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना बीडमध्ये सुरु असलेल्या प्रकरणावरुन विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी स्पष्पणे प्रतिक्रिया दिली. मी माझ्या रोजच्या कामात व्यस्त आहे. बीडम धील तणाव निवळावा, यासाठी आपण गृहमंत्र्यांशी चर्चा करू, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

## संतोष देशमुख प्रकरणात न्यायालयीन समितीची स्थापना

बीड सरपंच हत्या प्रकरणाचा तपास सध्या सीआयडी आणि एसआयटीकडून सुरु आहे. राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एका समितीची स्थापना केली होती. या समितीमध्ये बदल करावा, अशी मागणी केली जात होती. त्या मागणीनुसार राज्य सरकारने त्या समितीमध्ये बदल करत नव्या समि तीची स्थापना केली होती. सीआयडी आणि या समितीकडून या प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात तपासासाठी न्यायालयीन समितीचीदेखील मागणी काही जणांकडून केली जात होती. या प्रकरणातील प्रत्यक्ष हत्या करणा-या आरोपींना अटक करण्यात आली आहे. केवळ कृष्णा आंधळे नावाचा आरोपी हा फरार आहे. त्याचादेखील शोध सुरु आहे. तसेच हत्या प्रकरणाचा कट कोणी रचला होता, हत्या का केली? याचा सखोल तपास केला जातोय. या प्रकरणी सीआयडी आणि एसआयटीकडून कोर्टात अनेक दावे करण्यात आले आहेत. त्यानंतर आता याच प्रकरणी राज्य सरकारने मोठं पाऊल उचललं आहे. राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी माजी न्यायाधीश एम. एल. ताहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समितीची स्थापना केली आहे. राज्य सरकारकडून याबाबत जीआरदेखील काढण्यात आला आहे. राज्य सरकारने सेवानिवृत्त न्यायाधीश एम. एल. ताहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. ही समिती आता संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करणार आहे. माजी न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली आता या प्रकरणाचा तपास होणार आहे. तहलियानी यांनी मुंबई २६/११ बॉम्ब हल्याच्या खटल्यात न्यायमूर्ती म्हणून काम केलं आहे. तसेच प्रसिद्ध दिवंगत गायक आणि संगीतकार गुलशन कुमार यांच्या हत्येच्या खटल्यावेळीदेखील न्यायाधीश होते. तहलियानी हे निवृत्त झाले आहेत. पण राज्य सरकारने त्यांच्यावर संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासाची मोठी जबाबदारी दिली आहे. राज्य शासनाने जीआरमध्ये नेमकं काय म्हटलं आहे? महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या हिवाळी अधिवेशनात मा. विधानसभा सदस्यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेस उत्तर देताना मा. मुख्यमंत्री यांनी सभागृहात आश्वासित केल्यानुसार मस्साजोग, ता. केज, जि. बीड येथील सरपंच श्री. संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या प्रकरणी शासन निर्णय घेण्यात आला की, मस्साजोग ता. केज, जि. बीड येथील सरपंच श्री. संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीश मा. एम. एल. ताहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली ङ्गएक सदस्यीय चौकशी समितीङ्ग गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेसचे बीडमधील ४५ पदाधिकारी चौकशीच्या फेऱ्यात; अजित पवारांनी अख्खी कार्यकारिणीच केली बरखास्त

बीड। प्रतिनिधी मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्येनंतर बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांवर वेगवेगळे सातत्याने आरोप होत आहेत. किंबहुना काही पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी चौंकशीसाठी बोलावल्याच देखील पाहायला मिळालं आणि यामुळेच आता जिल्ह्याची कार्यकारणीच बरखास्त करण्याचा निर्णय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी घेतला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार बुधवारी मुंबईत असणाऱ्या पक्षाच्या प्रदेश कार्यालयात आले आणि याच ठिकाणी त्यांनी तातडीने बीड जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख राजेश्वर चव्हाण यांना देखील बोलावलं. त्यानंतर काही महत्त्वाचे निर्णय अजित पवारांना घेतल्याचे पाहायला मिळाले. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील ४० ते ४५ पदाधिकाऱ्यांना पोलीस यंत्रणांकडून चौंकशीसाठी बोलवण्यात आल्याचे चित्र काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राने पाहिलं. या चौंकशीच्या माध्यमातून तपास यंत्रणांना काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागल्याची बाब देखील समोर आली. आणि त्यानंतर पक्षाच्या जिल्ह्याच्या कार्यकारणीवर जोरदार टीका देखील होयला सुरुवात झाली. चौंकशीच्या निमित्ताने खुद्द पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना देखील पोलिसांनी चौंकशीला बोलावलं होते. संतोष देशमुख खून प्रकरणामध्ये अटकेत असलेला आरोपी विष्णू चाटे हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा तालुकाध्यक्ष आहे. विष्णू चाटे याचा थेट संबंध वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांच्याशी असल्याची देखील जिल्ह्यामध्ये चर्चा आहे आणि त्यामुळेच विष्णू चाटे सह जिल्हाध्यक्ष आणि पक्षाचे विविध पदाधिकारी यांना देखील पोलिसांनी चौंकशीला बोलावलं होतं. माध्यमांमधून पक्षाची पदाधिकारी चौंकशीला जात असल्याची सातत्याने येणारी बाब पाहता पक्ष सातत्याने टीका होत असल्यामुळे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी कार्यकारणीच बरखास्त करण्याचा थेट निर्णय घेतल्याचे पाहायला मिळाले.

## कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी भव्य मोफत शिबिर


बीड-प्रतिनिधी येथील कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या रविवार दि १९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये वतीने करण्यात आले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे. सदरील शिबिर कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटल, आदर्श नगर,तहसील ऑफीस रोड, बीड येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ७०२०५९०७८८ वर संपर्क करावा.

# गेवराईत पुन्हा चोरट्यांनी घर फोडले; एक लाखांचा ऐवज लंपास

## चोरट्यांचे वारंवार आव्हान, तपास लागत नसल्याने पोलिसांची निष्क्रियता समोर

गेवराई : प्रतिनिधी गेवराई शहरात चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. पंधरा दिवसांपूर्वीच नववर्षाच्या पहाटे गेवराईतील ताकडगाव रोडवर चोरट्यांनी धुमाकूळ घातला होता. या घटनेचा तपास अद्यापही लागलेला नसताना तसेच नागरिक भयभीत असतानाच मंगळवारी रात्री पुन्हा ताकडगाव रोडवरीलच एक घर कुटुंब बाहेरगावी गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी फोडून आतमधील १ लाखांचा ऐवज लंपास केला. दरम्यान चोरटे पोलिसांना वारंवार आव्हान देत शहरातील घरे फोडत असताना या घटनेचा तपास लागत नसल्याने पोलिसांची निष्क्रियता समोर येत असून नागरिकांमधून तिव्र संताप व्यक्त होत आहे.

गेवराई शहरात काही ठराविक दिवसाच्या अंतराने चोरीच्या घटना सातत्याने होताना दिसत आहेत. बाजारात मोबाईल चोरी, बसस्थानकावर पॉंकेट मारी तसेच दुचाकी, चारचाकी चोरीच्या घटनेने अगोदरच नागरिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. शहरात अज्ञात चोरट्यांची



टोळी सक्रिय असून हि टोळी ठराविक दिवसाच्या अंतराने हात साफ करताना दिसत आहे. वारंवार चोरीच्या घटना होत असताना नागरिक दहशतीखाली असतानाच नववर्षाच्या पहाटे शहरातील ताकडगाव रोडवर चोरट्यांनी धुमाकूळ घातला होता. ताकडगाव रोडवरील श्री समर्थ पार्क येथील अशोकराव गोंडे यांच्या घराचे गेट तोडून आतमधील दुचाकी पळवली. तसेच त्यांच्या घराला बाहेरून लॉंक करुन चोरट्यांनी शेजारील तलाठी संजय पाखरे यांच्या घराचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यामध्ये यश आले नव्हते. यानंतर त्यांच्या घराचा दरवाजा बाहेरुन लॉंक करुन चोरट्यांनी बाजूच्या मातोश्री पार्कमध्ये मोर्चा वळवून त्याठिकाणी कृष्णा मधुरे यांच्या घरात कोणीच नसल्याचा फायदा घेत त्यांचे फोडून काही ऐवज लंपास केला होता. तसेच बाजूच्या एका घरासमोरील मोटारसायकल चोरण्याच्या प्रयत्नात चोरटे असतानाच त्याठिकाणी नागरिकांना जाग आल्याने चोरट्यांनी याठिकाणाहून धुम ठोकली. दरम्यान

### पोलिस बेफिकीर, रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल नाही

विठ्ठल ठोसर राहत असलेले किरायाचे घर मंगळवारी मध्यरात्री चोरट्यांनी फोडले. माहिती मिळाल्यानंतर सकाळी पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. मात्र यानंतर विठ्ठल ठोसर हे दोन वेळा पोलिस ठाण्यात जाऊन देखील पोलिसांनी गुन्हा दाखल केला नव्हता. त्यांना पोलिसांनी अन्य कामात असल्याचे सांगत वेळकाढूपणा केला. त्यामुळे गेवराई पोलिस चोरीच्या घटना किती गांभीर्याने घेतात ? हे या प्रकारावरून समोर येते. दरम्यान वारंवार होणा-या चोरीच्या घटनेबाबत पोलिस अधीक्षक यांनी गेवराई पोलिसांना फैलावर घेण्याची मागणी आता नागरिकांमधून होत आहे.

या घटनेला पंधरा दिवसांचा कालावधी लोटत नाही तोच पुन्हा एकदा चोरट्यांनी श्री समर्थ पार्कमधीलच विठ्ठल ठोसर यांचे कुटूंब बाहेरगावी गेल्याचा फायदा घेत त्यांच्या घराचा कडीकोंडा तोडून आतमध्ये प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी कपाटातील चांदीचे ताट, ग्लास, चैन, सोन्याची अंगठी, नथनी, लहान मुलींच्या कानातील असा १ लाखांचा ऐवज लुटून याठिकाणाहून चोरट्यांनी पोबारा केला. सकाळी शेजारच्या नागरिकांच्या हि बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी विठ्ठल ठोसर यांना व पोलिसांना माहिती दिली. यानंतर घटनास्थळी गेवराई पोलिसांनी दाखल होऊन पंचनामा केला. दुपारी फिंगरप्रिंट पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. दरम्यान वारंवार होणा-या चोरीच्या घटनेने नागरिक मात्र भयभीत झाले झाल्याचे एकंदरीत चित्र आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


# संपादकीय

## प्रयागराज येथील कुंभमेळा

प्रयागराज येथे सुरू झालेला कुंभमेळा म्हणजेच महाकुंभ आजवरचा जगातला सर्वांत मोठा धार्मिक, सांस्कृतिक उत्सव होणार आहे. मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर निदान एक कोटी भाविक अमृत स्नान करतील, अशी अपेक्षा आहे. सोमवारीच स्नान केलेल्या भाविकांची संख्या साठ लाखांच्या वर गेली होती. हा संपूर्ण सोहळा आता सलग ४५ दिवस म्हणजे २८ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या काळात तीन दिवस विशेष पवित्र म्हणजे अमृत स्नानाचे आहेत. अनेक आखाड्यांच्या शाही मिरवणुका आणि त्यांचा मान यांच्यामुळे या स्नानांना ङ्गशाही स्नानफअसे म्हणण्याची प्रथा पडली आहे. यंदा उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व आयोजन जास्तीत जास्त सुरळीत व्हावे, यासाठी कंबर कसली आहे. गेली तीन वर्षे या उत्सवाची तयारी विविध पातळीवर चालू आहे. यंदाचा महाकुंभ सुफळ संपूर्ण होईल, तोवर प्रयागराजमध्ये येणाऱ्या एकूण भाविकांची संख्या ४० कोटींच्या घरात जाऊ शकते. हा आकडा कल्पनेच्या पलीकडे मोठा आहे. जवळपास १८३ देशांमधील भाविकांनी कुंभमेळ्याची वेबसाइट पाहून यात सहभागी होण्याचा विचार चालविला आहे. विविध देशांमधील हजारो भारतीय, तसेच अभारतीय या आधीच भारतात आले असून हा आकडा महिन्याभरात काही लाखांपर्यंत जाईल. इतके भाविक येणार असल्याने असंख्य प्रकारच्या यंत्रणा व व्यवस्था उभ्या कराव्या लागल्या आहेत. उत्तर प्रदेश सरकार काही हजार कोटी या महाकुंभाच्या आयोजनासाठी खर्च करीत आहे. शिवाय, केंद्र सरकारने विशेष अनुदान दिले आहे. महाकुंभ ही जशी धार्मिक आघाडीवरची महाघटना आहे; तशीच ती आर्थिक आघाडीवरची महाघडामोड होणार, हेही स्पष्ट आहे. काही तज्ज्ञ आणि संस्थांच्या मते या काळात किमान दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल, असा अंदाज आहे. ही मोठी उलाढाल अर्थकारणाला, तसेच रोजगार निर्मितीला चालना देणारी आहे. महाकुंभाच्या निमित्ताने याआधीच कित्येक हजार रोजगार निर्माण झाले आहेत. हा आकडा वाढणार आहे. देशात धार्मिक उत्सवांमध्ये होणारी चेंगराचेंगरी आणि भाविकांचे बळी यांचा इतिहासच आहे. सन १९५४ मध्ये कुंभमेळ्यात आठशे भाविकांचा प्राण गेला होता. त्यानंतरही अशा घटना घडत आल्या आहेत. यंदा हे टळावे म्हणून कृत्रिम प्रज्ञेची म्हणजे एआयची तर मदत घेण्यात आली आहेच; पण योगी सरकारने सप्त-स्तरीय संरक्षण यंत्रणा उभारली आहे. या बाबी यंदा कशा यशस्वी ठरतात, यावर पुढच्या धार्मिक आयोजनांना नवी दिशा मिळणार आहे. कुंभमेळ्यांमधील अस्वच्छता, तेथे वृद्धांना सोडून देणे किंवा तिथे होणारे संघर्ष याबाबत टीका होत आली आहे. ती होणारच. मात्र, देशातील कोट्यवधी नागरिकांच्या ज्या श्रद्धा आहेत; त्यांची अवहेलना न करता त्यांचा सन्मान करूनच नव्या वाटा शोधायला हव्यात. कुंभमेळ्यांमध्ये येणारे सगळे साधू भोंदू किंवा नुसतेच भस्मचर्चित नाहीत. जीवनाचा व विश्वाचा आपापल्या परीने अर्थ शोधणारे उच्चशिक्षित मुमूक्षूही असतात. नागा किंवा इतरही साधूंमध्ये कित्येक उच्चशिक्षित तरुण-तरुणी आहेत. त्यात मुंबई आयआयटीसहित अनेक संस्थांमध्ये शिकलेले विद्याविभूषित आहेत. यातल्या चिदानंद सरस्वती या साधूंनी तर ङ्गमेरी थाली, मेरा थैला, कुंभ नही होगा मैला...फअसा प्रण केला आहे. प्लास्टिक बाटल्यांच्या क्रशरपासून प्रत्येक भाविकापर्यंत स्टीलची थाळी, पेला व पिशवी पोहोचविण्यासाठी चिदानंद सरस्वती धडपडत आहेत. ही संकल्पना राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही स्वीकारली असून आजवर देशभरातून काही लाख थाळ्या आणि कापडी पिशव्या जमा केल्या आहेत. त्या आता प्रयागराजमध्ये वाटल्या जात आहेत. हृषीकेशच्या परमार्थ निकेतन आश्रमाचे प्रमुख असणाऱ्या चिदानंद सरस्वती यांच्या अंदाजानुसार यंदाच्या कुंभमेळ्यात एकूण ५० लाख टन कचरा निर्माण होण्याची शक्यता आहे. यातला दहा ते वीस टक्के कचरा कमी झाला तसेच त्याच्यावर प्रक्रिया झाली, तर ते मोठेच यश ठरेल. ङ्गगंदगी और बंदगी साथ साथ नहीं जा सकतेफहा संस्कार सगळ्या श्रद्धावान भाविकांपर्यंत न्यायचा आहे, असे चिदानंद सरस्वती म्हणतात, ते योग्य आहे.

# आंबेडकरी चळवळीसाठी सर्वस्व अर्पण करा

२०२४ ची लोकसभा निवडणूक संपली.अनेक पक्ष आणि संघटनांनी निवडणुकीत सहभाग घेतला. काही पक्ष, संघटना फक्त निवडणूक जिंकण्यासाठी एक दुसऱ्यांच्या मदतीसाठी आधार बनून लढल्यात. कारण त्यांच्यात वैंचारिक भेदभाव नव्हता.सत्तेत जाण्यासाठी काही पण एवढाच एक हेतू होता.अनेकांचा हेतू सफल झाला.या प्रत्येकाने लोकसभेची निवडणूक जिंकली. काही पक्षांनी संघटनांनी नुसताच दुसऱ्यांचा प्रचार केला.त्यावेळी कोणतीही अट,ठेवली गेली नाही.बिन भांडवली मदत करणाऱ्यांचे ही काही वेगळे मनसुबे होते.भविष्यासाठी काही राखीव डावपेच होते.हे सारे राजकारणात स्थिरावलेले आणि कुठल्याही समाजाचे प्रतिनिधित्व नसलेले लोक आहेत.यातील अनेकांनी राजकारण हाच एकमेव व्यवसाय म्हणून किंवा अर्थार्जनाचं साधन म्हणून राजकारणाकडे पाहिलं.यांना कोणीही जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की आम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे असं सांगितलं नाही. तरीही हे सारेच शासनकर्ते झालेत. याउलट बौद्धांना किंवा महारांना बाबासाहेबांनी शासनकर्ती जमात बनण्याचे स्वप्न दिले. ते ७४ वर्षांमध्ये कधीच आंबेडकर वाद्यांना पूर्ण करता आले नाही.हा समाज शिकला सुटा बुटात आलाश्र. त्यामुळेच की काय संघटना आणि संघर्ष हे दोन्ही शब्द,त्या शब्दांची व्याप्ती हा समाज विसरला.धोतर पंचा आणि सुटा बुटापर्यंतचा प्रवास म्हणजे प्रगती, असं या समाजाला कदाचित वाटत असावं. म्हणूनच सामाजिक धार्मिक आणि राजकीय अशा तीनही क्षेत्रात हा समाज मागे पडलेला दिसतोय.६ डिसेंबर,१४ ऑक्टोबर,१४ एप्रिल ला विहारं उघडतात.काही ठिकाणी विहारात चकाकतात. अनेक ठिकाणी रंगरंगोटीचा पत्ताच नसतो.पण ह्या तारखांना वर्गणी,डीजे,सामूहिक जेवण,नाच गाणी यात कार्यक्रम गुंडाळला जातो.त्याचे काही फोटो व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होतात.अनेक लोक बाबासाहेबांना बापाचा बाप म्हणतात.स्वतःचा फोटो बाबासाहेबांसोबत बरोबरीने लावतात.तिथे आंबेडकरवाद संपतो. परत त्याच तारखांच्या प्रतीक्षेत मग हा समाज वर्षभर झोपा काढतो. कारण सामाजिक राजकीय आणि धार्मिक क्रांतीचं काम अशा नवश्या गौशांच्या दृष्टीने संपलेलं असतं. त्यामुळे बाबासाहेबांच्या कल्पनेतील स्वाभिमानी बाणेदार आणि लढाऊ समाज आजपर्यंत निर्माण होऊ शकला नाही. अनेकदा आमच्या समाज प्रगत आहे वैंचारिक आहे वगैरे आपण ऐकतो.काही काळानपुरतं मलाही तसंच वाटत होतं.पण मागील काही वर्षांपासून वर्षांचा अनुभव आणि निरीक्षण आपण वैंचारिक किंवा प्रगल्भ आहोत ह्या केवळ अफवा वाटतात. कारण माणूस विचारांनी प्रगत झाला असेल तर तो त्याचं स्वतःचं मत तयार करतो. त्याच्याकडे एक निर्णय क्षमता असते. ती निर्णय क्षमता कथित आंबेडकर वाद्यांमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक पातळीवर आंबेडकरी समाजाची पीछेहाट होताना दिसून येते. समाजात भाडखाउंची संख्या वाढत चाललीय. राजकारण ही सर्व समस्यांची किल्ली आहे असे बाबासाहेब म्हणाले होते. त्यामुळेच त्यांनी शासनकर्ती जमात बनण्याचे स्वप्न दिले. पण बाबासाहेबांचे हे स्वप्न वास्तव रूप धारण करू शकले नाही . प्रत्येक घरात नेता निर्माण झाला. आणि साधा नेता नाही तर राष्ट्रीय अध्यक्ष झाला. बरे राष्ट्रीय अध्यक्ष झाला तरी काही हरकत नाही. तो गुलाम झाला ही खरी शोकांतिका आहे.याचं खरं दुःख आहे. सदैव समाज विक्रीला बांधून दुसऱ्यांची हुजरेगिरी करणारा नेता निर्माण झाला. लोकसभेत आणि विधानसभेत कुठलेही स्थान मिळाले नाही तरी भाजपच्या विजय उत्सवात हे रिपब्लिकन नेते हात उंचावून आनंद साजरा करतात तेव्हा पायातील चप्पल यांच्या मुस्काटात मारावी इतका टोकाचा राग येतो. आणि प्रत्येक प्रामाणिक आंबेडकर वाद्यांना असा राग येत असावा. भाजपच्या विजयासाठी प्रयत्न करणारे योगदान देणारे हे नेते आहेत ,

# बसवराज तेली हे आष्टीचे जावई, त्यांचे सुरेश धसांसोबतः वाल्मिक कराडच्या पत्नीचा खळबळजनक आरोप




बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला एक महिना उलटला आहे. या हत्या प्रकरणातील मास्टरमाईड असलेल्या वाल्मिक कराडला ७ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावण्यात आली आहे. तर दुसरीकडे काही दिवसांपूर्वी संतोष देशम ुख यांच्या हत्येच्या तपासासाठी नेमलेली एसआयटी समिती रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी ७ नवीन अधिका-्यांची एसआयटी समिती स्थापन करण्यात आली आहे. पोलीस उपमहानिरीक्षक बसवराज तेली हे या नवीन एसआयटीचे प्रमुख आहेत. आता वाल्मिक कराड यांची पत्नी मंजिली कराड हिने बसवराज तेली यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मंजिली कराड यांनी नुकतंच पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आमदार सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. बसवराज तेली हे आष्टीचे जावई आहेत. ते शीतल तेली यांचे पती असून त्या खअड अधिकारी आहेत. सुरेश धस यांचे ते जवळचे आहेत, असा आरोप मंजिली कराड यांनी केला आहे. त्यामुळे डखढ मधील अधिकारी बदला, अशी मागणी मंजिली कराड यांनी केली आहे. सुरेश धस आणि बसवराज तेली यांचे उऊठ काढा बजरंग सोनवणे हे निवडून येण्यासाठी माझ्या पतीनं मदत केली. दोन मंत्री संपवण्यासाठी वाल्मिक कराड याला संपवणे गरजेचे असल्याने त्यांना बळीचा बकरा केला जात आहे. डखढ मधील आठही अधिकारी बदला. यात कोणाचेही नातेवाईक नसावे. उऊठ काढण्याची हौस आहे ना तर सुरेश धस आणि बसवराज तेली यांचे उऊठ काढून बघा, किती फोन झाले आहेत ते कळतील असे मंजिली कराड म्हणाल्या.माझ्या पतीचा याच्याशी काहीही संबंध नाही माझ्या नव-यावर खोटे आरोप करुन डखढ चे लोकं काहीही करु शकतात. संतोष देशमुख हत्या प्रकरण जेव्हा घडले, त्यावेळी माझे पती परळीमध्ये नव्हते. माझ्या पतीचा याच्याशी काहीही संबंध नाही. सरकार स्थापन झाले तेव्हा दोन मंत्री हे वंजारी आमच्या अल्पसंख्यांक समाजाचे झाले. हे मराठा समाजाच्या नेत्यांना पटलं नाही. सुरेश धस यांचं स्टेटमेंट आहे, मी तुमची माती करेल. बजरंग सोनावणे यांनी माझ्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली होती. वंजारी समाज अल्पसंख्यांक असल्याने समाजाला दाबण्यासाठी हे सगळं सुरु आहे. गरीब समाज आणि लोकांना टार्गेट करू नका. ज्यांचा खून झाला त्यांचा आणि माझ्या नव-्याचा काहीही संबंध नाही. त्यांचा साधा एक फोनही झालेला नाही. ते एकमेकांना ओळखत देखील नाही. आमच्या नेत्याना संपवण्यासाठी सगळं सुरु आहे असे मंजिली कराड म्हणाल्या.

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर या प्रकरणात अखेर मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांच्यावर खूनाचा गुन्हा आणि मोक्का देखील दाखल केला आहे. केज येथून वाल्मीक कराड यांना आज बीड न्यायाल-ात हजर करण्यात आले आहे. या दरम्यान, परळीचे व्यवहार गेली दोन दिवस कराड यांच्या समर्थकांनी बंद पाडले आहेत. कराड समर्थकांनी जाळून घेण्याचा देखील प्रयत्न काल झाला होता. या प्रकरणात आज वकीलांमध्येच फूट पडली. आणि दोन्ही पक्षाचे वकील या प्रकरणात तावातावाने मीडियासमोर आपली बाजू मांडू लागल्याचे विचित्र चित्र राज्यातील जनतेला पाहायला मिळाले. या प्रकरणात दोन्ही बाजूंचे वकील एकमेकांना स्टंटबाज म्हणू लागल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. यातच पांगरी या गावात कराड समर्थ महिलांच्या तर अंगात आल्याचे चित्र पहायला मिळाले.**

# राष्ट्रीय महामार्गाव पाडलेसिंगी येथे आज रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले

बीड ।प्रतिनिधी दिनांक, १०/०१/२०२५ रोजी महामार्ग पोलीस केंद्र गेवराई हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी शिवारातील जय भवानी साखर कारखाना गढी येथे रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. वाहतुकीचे नियम सांगून ट्रॅक्टरला व बैलगाडी ला रिफ्लेक्टर लावणे बाबत, जेणे करून रात्रीच्या वेळी बैलाच्या शिंगांना रेडीयम लावण्यात यावे, रस्त्याने चालत असताना सव्हिर्स रोडचा वापर करावा महामार्ग वर डाव्या बाजुनू ऊसाने भरलेले वाहन चालवावे व ट्रॅक्टर चालक यांनी टेपचा आवाज कमी करावा. जेणे करून पाठीमागील वाहनांचा आवाज तुमच्या पर्यंत येईल वापरणे दारू पिवून वाहन चालू नये.जर उसाची ट्रॉली पलटी झाली तर १०८ महामार्ग पेट्रोलिंग यांना तात्काळ



कळवतील.जेणे करून वाहतूक कोंडी होणार नाही.अपघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच अपघातग्रस्तांना मदत करने मदत केल्यास तुम्हाला पोलीसा कडून कोणतीही अडचण येणार नाही तसेच अपघात संबंधाने मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशा बाबत चालक व प्रवासी यांना माहिती दिली या वेळी आम्ही सोबत पोह-१६४६ म्हेत्रे,पोना -८९९ गडदे ,चापोह -२०५० जमशेटे हजर होते व कारखान्यावरील ५० ते ६० चालक व ऊस तोड कामगार हजर होते.

# बीड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तारदिन साजरा



प्रतिनिधी । बीड भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा तिसावा नामविस्तार दिन सोहळा मंगळवार (१४ जानेवारी) रोजी सकाळी ९ वाजता बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे साजरा करण्यात आला. या प्रसंगी महामानव अभिवादन ग्रुप,शाक्य संघ, सम्राट अशोक ग्रुप,सेवानिवृत्त पोलिस अधिकारी कर्मचारी संघ,भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दल, महिला मंडळा इत्यादी संघटनांच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तर नामांतर लढ्यात शहिद झालेल्या भिमसैनिकांना मानवंदना देण्यात आली. यानंतर सामुहिक बुध्दवंदना घेण्यात आली. या प्रसंगी प्रशांत वासनिक यांनी मनोगत व्यक्त करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमासाठी महामानव अभिवाद ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, प्रा. अशोक गायकवाड,पी.व्ही. बनसोडे, यु.एस. वाघमारे, डी.जी. वानखेडे, प्रशांत वासनिक, आर.डी.चक्रे,डी.एम.राऊत, के.एस. वाघमारे, वंदना वाघमारे, मंदा मस्के, पंचशिला सरपते, सत्यप्रकाश कांबळे, ज्ञानोबा पोटभरे, बापू उजगरे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी कर्मचारी, कुमारथ पारवे, कल्याण भंडारे, भास्कर सोनवणे, अशोक ठोकळ, सोनाजी शिंदे, श्रीपती मस्के, आबा चक्रे, भारतीय बौध्द महासभेचे सदाशिव कांबळे, अनिल डोळस, सिध्दांत चिक झगझाप, सामाजिक कार्यकर्त्या अरुणाताई आठवले,प्रतिभा वाघमारे, संगिता वाघमारे, अनिता डोंगरे यांच्यासह मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## महिनाभर ऊस तोडून घेतला, पैसे मागताच डांबलं; मजुरांकडूनच घेतले २८000 हजार

दिवसाला ५०० रुपये मजुरी देऊ, असे सांगत त्यांना ऊसतोड करण्यासाठी आणण्यात आले. महिनाभर ऊस तोडून घेतला. मजुरांनी पैसे मागितले आणि घरी जाण्याचा विषय काढताच त्यांना डांबण्यात आलं. एका गावात त्यांना २४ तास ओलीस ठेवण्यात आलं. इतकंच नाही, तर मजुरांच्या कुटुंबीयांकडून पैसे उकळले. सुटका झाल्यानंतर मध्य प्रदेशात पोहोचलेल्या कामगारांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन ही व्यथा सांगितली. त्यानंतर हे सगळं प्रकरण समोर आलं. गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची जोरात चर्चा सुरू आहे. यावरून वातावरण तापलेलं असतानाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीडमधील एका ऊसतोड मुकादमाने ऊसतोडीसाठी मध्य प्रदेशातील १६ मजुरांना आणले. दिवसाला ५०० रुपये मजुरी देण्यात येईल, असे या मजुरांना सांगण्यात आले होते. हे मजूर बीडमध्ये आले. त्यांच्याकडून महिनाभर ऊसतोड करून घेतली गेली. डांबून ठेवण्यात आलेले हे सर्व मजूर मध्य प्रदेशातील कटनी जिल्ह्यातील कुठला तालुक्यातील आहेत. या मजुरांनी सुटका झाल्यानंतर घर गाठले आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन सगळा घटनाक्रम सांगितला. डांबून ठेवण्यात आलेल्या १६ मजुरांपैकी एक असलेल्या हरी सिंह यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील बीडमध्ये ऊस तोडण्यासाठी नेण्यात आले होते. ५०० रुपये मजुरी देण्यात येईल असे सांगितले होते. पण, तिथे गेल्यानंतर मुकादमाने आमच्याकडून काम करून घेतले. त्यानंतर आम्हालाच जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. डांबून ठेवले आणि सोडण्यासाठी आमच्याकडूनच पैसे घेतले. आमच्या कुटुंबीयांनी २८ हजार ऑनलाईन पाठवल्यानंतर आम्हाला सोडण्यात आले

## महिला महाविद्यालयात
### नामविस्तारदिन सोहळा उत्साहात संपन्न



येथील कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात १४ जानेवारी हा नामविस्तार दिन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कोषाध्यक्ष प्रा . प्रसाद देशमुख , महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विद्याताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती . भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विधिवत् या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला . महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. राजकुमार यल्लावाड यांनी आपल्या मनोगतात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार संघर्षाचा सविस्तर आढावा घेतला . संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख यांनी या डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठास देदीप्यमान इतिहास व यशस्वी लढ्याची पार्श्वभूमी आहे असे सांगून येत्या काळात हे आपले विद्यापीठ उत्तुंग भरारी घेईल असे सांगितले नंतर प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी ही या प्रसंगी सर्वांना मकरसंक्रांत व नामविस्तारदिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ . अरुण चव्हाण यांनी मानले . याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी वृन्द मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

## स्व.संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठीलढणा-या योद्ध्यांप्रती कृतज्ञता व्यक्तकरण्यासाठी लिंबागणेश येथे दुग्धाभिषेक

बीड |प्रतिनिधी मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळावा अमानुष हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावरील लढाई लढणाऱ्या मराठा आरक्षण योध्दा मनोजजी जरांगे पाटील आणि सभागृहात लढाई लढणारे आ. सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर,आ. जितेंद्र आव्हाड आणि जिल्ह्यात सक्रिय असणारे राजेंद्र मस्के यांच्या प्रतिमेची काल दि.१४ मंगळवार रोजी वाल्मिक कराड यांना पोलीस प्रशासनाने मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर



परळीतील वाल्मिक कराड समर्थकांनी गदारोळ करत सार्वजनिक ठिकाणी मनोजजी जरांगे पाटील, आ.सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर,आ. जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधींनी स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी संविधानिक पद्धतीने सभागृहात व रस्त्यावर आवाज उठवला म्हणुन आज दि.१५ बुधवार रोजी सकाळी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बालाघाट परीसराच्या वतीने शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वात विक्की आप्पा वाणी, अशोक वाणी ,विनोद चौरे,गणेश वाणी,उमेश वाणी यांनी मनोज जरांगे पाटील व वरील लोकप्रतिनिधींच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक केला. जिल्हा प्रशासनाने जमावबंदीचे आदेश लागू केले असल्याने कायद्याचे उल्लंघन होऊ नये याची दक्षता घेत केवळ ४ जणांनी यात सहभाग घेतल्याचे बाळासाहेब मोरे पाटील यांनी सांगितल

## सामाजिक न्याय भवनचे गुणवत्ता काम दाखवा आणि मिळवा ११ हजार रुपयाचे रोख बक्षीस

बीड |प्रतिनिधी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी काही दिवसापूर्वी अंदाजे ९३ लक्ष रुपयाचे दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामध्ये वॉशरूम दुरुस्ती व त्यामधील पाईपलाईन, खिडक्या दरवाजे बसविणे, छताचे लिकेज काढणे, रंगरंगोटी अशा पद्धतीचे कामे होते. सदरील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी रंगरंगोटीचे काम केले आहे का नाही हे लक्षात येत नाही तसेच अगोदरचे सागवानी दरवाजे काढून निकृष्ट दर्जाचे दरवाजे बसवलेले आहेत तसेच वॉशरूम मध्ये दोन-तीन कडाप्पे पडलेले होते ते फक्त उभा करायची होते परंतु त्यामध्येही त्यांनी बोगस कामे केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता बोराडे व शाखा अभियंता भागवत यांनी संबंधित गुत्तेदारासोबत हात मिळवणी करत मापे न घेता अंदाजपत्रकात नमूद खोटे मापे जोडत मोजमाप पुस्तिका नुसार संबंधित गुत्तेदाराला बिल अदा केलेले आहे तक्रार देऊनही कारवाई केली जात नाही गुत्तेदाराच्या माध्यमातून दबाव तंत्राचा वापर केला जातो सदर प्रकरणी सखोल चौकशी करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी झालेल्या दुरुस्तीच्या कामाची गुणवत्ता तपासणीसाठी त्वरित चौकशी समिती गठित करावी यासाठी कार्यालयासमोर कामे दाखवा ११ हजार रुपये रोख बक्षीस मिळवा अशा पद्धतीच्या लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप-अभियंता बोराडे शाखा अभियंता भागवत व काम करणारे कन्स्ट्रक्शन यांच्यावर ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करत शासन नियमानुसार निलंबनाची कारवाई करण्यात यावी व संबधित कन्स्ट्रक्शन यांना काळे यादीमध्ये टाकण्यात याव

## गढी महाविद्यालयात नामविस्तार दिन साजरा

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थी विकास, सांस्कृतिक व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रो. डॉ. राणी जाधव तर प्रो. डॉ. सदाशिव सरकटे यांची कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थिती होती. डॉ. राणी जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या नामविस्ताराच्या पाठीमागे असणारा नामांतराचा प्रदीर्घ लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान व वर्तमान स्थितीत शैक्षणिक क्षेत्रात आवश्यक असणारे बदल याविषयी सविस्तर माहिती सांगितली. महापुरुषांच्या नावाने आज अनेक विद्यापीठे आहेत, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे पण त्यांच्या विचारांचा वारसा चालवणे हे खरे आपल्या पुढील आव्हान असणार आहे असेही प्रो.डॉ. राणी जाधव यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सदाशिव सरकटे यांनी विद्यापीठाच्या उभारणीत व नामविस्तारातील तत्कालीन नेत्यांची भूमिका याविषयी विस्ताराने माहिती सांगून उच्च शिक्षण हे विचारांना प्रबळ करणारे साधन आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक, सामाजिक योगदान हे आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच हा नामविस्तार महत्वाचा ठरतो. आज विद्यापीठात विविध प्रकारची आव्हाने आहेत ती पेलण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले तरच हे विद्यापीठ टिकू शकेल व आज जे त्याचे राष्ट्रीय स्तरावर स्थान आहे ते अबाधित राहू शकेल असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.धर्मराज कटके तर आभार प्रा. डॉ.जयराम ढवळे यांनी केले. यांनी मानले.तर सूत्रसंचालन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा.हिरा पोटकुले यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांनी प्रयत्न केले.

## अवैद्य वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परवर शहर पोलिसांची कारवाइ
### ७,१०,००० रुपयाचा मुद्देमाल जप्त

माजलगाव । दिनांक १४/१/२०२५ रोजी रात्री माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ हे पोलीस कर्मचाऱ्यांसह पोलीस स्टेशन हद्दीमध्ये रात्रीची गस्त घालत असताना च्या दरम्यान रात्री ०२:१५ वाजण्याचे सुमारास मंजरथ रोड माजलगांव येथे अवैध वाळु वाहतुक करणारे टिप्पर पोलीस वाहनास पाहुन पळुन गेले नमुद वाहनाचा पाठलाग केला असता वाहनाचा चालक वाहनातील वाळू खाली करून टिप्पर जागीच सोडुन तेथुन पळुन गेला. सदर वाहनामध्ये दोन ब्रास वाळु किमती १०,०००/- रुपये तसेच पासिंग क्रमांक नसलेले अशोक लिलँड कंपनीचे टिप्पर किंमत ७,००,०००/- रुपये असा एकुण ७,१०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन सदर वाळू गउइ च्या साहाय्याने टिप्पर मध्ये भरून सदरचे वाहन पोलीस स्टेशन मध्ये आणून टिप्परचे चालक व मालक यांच्या विरुध्द गु.र.नं. १६/ २०२५ कलम ३०३ (२), ३ (५) भारतीय न्याय संहीता - २०२३ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र पोलीस रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम संपन्न

दिनांक, १०/०१/२०२५ रोजी महामार्ग पोलीस केंद्र गेवराई हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी शिवारातील जय भवानी साखर कारखाना गढी येथे स. पो. नी. सचिन कापुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. वाहतुकीचे नियम सांगून ट्रॅक्टरला व बैलगाडी ला रिफ्लेक्टर लावणे बाबत, जेणे करून रात्रीच्या वेळी बैलाच्या शिंगांना रेडीयम लावण्यात यावे, रस्त्याने चालत असताना सर्व्हिस रोडचा वापर करावा महामार्ग वर डाव्या



बाजुनू ऊसाने भरलेले वाहन चालवावे व ट्रॅक्टर चालक यांनी टेपचा आवाज कमी करावा.जेणे करून पाठीमागील वाहनांचा आवाज तुमच्या पर्यंत येईल वापरणे दारू पिवून वाहन चालू नये.जर उसाची ट्रॉली पलटी झाली तर १०८ महामार्ग पेट्रोलिंग यांना तात्काळ कळवतील. जेणे करून वाहतूक कोंडी होणार नाही. अपघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच अपघातग्रस्तांना मदत करने मदत केल्यास तुम्हाला पोलीसाकडून कोणतीही अडचण येणार नाही तसेच अपघात संबंधाने मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशा बाबत चालक व प्रवासी यांना माहिती दिली या वेळी पोलिस अंमलदार संघर्ष गोरे ,सोबत पोह-१६४६ म्हेत्रे,पोना -८९९ गडदे ,चापोह -२०५० जमशेटे हजर होते व कारखान्यावरील ५० ते ६० चालक व ऊस तोड कामगार हजर होते.

# असे करा हरभऱ्यावरील घाटेअळीचे व्यवस्थापन

बीड । सद्यस्थितीत हरभरा हे पिक फुलोरा ते घाटे भरण्याच्या अवस्थेत असून मागील काही दिवसातील ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावरील घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच अंधाऱ्या रात्रीत घाटेअळीचे पतंग मोठ्या प्रमाणावर अंडी देतात. या सर्व बाबी घाटेअळीस पोषक असल्यामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी या अळीने प्रादुर्भाव करण्यास सुरुवात केली आहे. हि कीड बहुभक्षी असून विशेषतः पीक फुलोरा आणि प्रामुख्याने घाटे अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, व फुले कुरतडुन खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या घाटे कुरतडुन त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसुन आतील दाणे खातात. साधारणतः एक अळी तीस ते चाळीस घाट्यांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस्थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच उपाय योजना केल्यास कमी खर्चात किडींचे प्रभावी नियंत्रण होऊ शकते. या किडीचे खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करावे. एकात्मिक व्यवस्थापन :- शेतामध्ये इंग्रजी quot; Tquot; आकाराचे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत. घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस ८ ते १० पतंग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत. हरभरा पीक फुलोरा अवस्थेत असतांना ५० टक्के निंबोळी अर्काची किंवा ३०० पीपीएम झाडीरेक्टीन ५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. अथवा वातावरणात सापेक्ष आर्द्रता पुरेशी असल्यास व्यूहेरीया बॅसीयांना या जैविक बुरशीनाशकाची ६० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे करावी. त्यामुळे घाटेअळीचे नियंत्रण होऊन तिच्या नैसर्गिक शत्रू कीटकांना अपाय न होता घाटेअळीचे नियंत्रण करण्यास मदत होईल. घाटेअळीने आर्थिक नुकसान संकेत पातळी गाठल्यास (सरासरी १ ते २ अळी प्रति मीटर ओळीत किंवा ५ टक्के घाट्यांचे नुकसान)शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा; अन्यथा फवारणी टाळावी. वरील प्रादुर्भाव पातळी गाठल्यानंतर फवारणी केल्यास आपल्या उत्पादनामधील घट टाळून फवारणीचा खर्च भरून निघेल; अन्यथा फवारणीचा खर्च वाया जाऊ शकतो, याची शेतक-यांनी कृपया नोंद घ्यावी. किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालील कोणत्याही एका कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून साध्या (नॅपसॅक) पंपाने फवारणी करावी. पावर पंपाने फवारणी करायची असल्यास कीटकनाशकांचे प्रमाण तिप्पट करावे. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी. अ.क्र कीटकनाशके मात्रा / १० लि.पाणी क्लोरपायरिफॉस २० ईसी किंवा २० मिली क्विनालफॉस २५ ईसी किंवा २० मिली इमामेक्टीन बेंझोएट ५ एसजी किंवा ४ ग्रॅम,क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ एससी किंवा २.५ मिली ३९;लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ईसी किंवा १२ मिली नोव्हाल्युरॉन १० ईसी १५ मिली शेतात किटकनाशकाची फवारणी करतांना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा व सुरक्षिततेची योग्य ती काळजी घ्यावी,असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,बीड सुभाष साळवे यांनी केले आह

## शिक्षण हे मानवाच्या प्रगतीचे साधन-प्रा.गौतम गायकवाड

अंबाजोगाई दि.१५ (प्रतिनिधी): शिक्षण हे मानवाच्या प्रगतीचे साधन असून त्या शिक्षणातून चारित्रसंपन्न नागरिक घडावा अशा शिक्षणाची गरज असल्याचे मत प्रा. गौतम गायकवाड यांनी व्यक्त केले. येथील खोलेश्वर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी हे होते. मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य दीपक फुलारी, बिभिषण फड ,प्रा.आनंद पाठक , प्रा.सतीश हिवरेकर हे उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. गायकवाड म्हणाले की, माणूस घडविण्याचे साधन शिक्षक आहे शिक्षकांनी कालसुसंगत शिक्षण देणे आवश्यक आहे.कोणत्याही देशात शिक्षण व आरोग्याचे खाजगीकरण होऊ नये, तसे झाले तर देश मरतो, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील शिक्षक, संस्थाचालक यांची कर्तव्ये त्यांनी विषद केली. अध्यक्षीय समारोपात राम कुलकर्णी म्हणाले की, मकरसंक्रांती दिनी माणसाच्या मनाचे संक्रमण होऊन मनात एकमेकांबद्दल गोडवा निर्माण व्हायला हवा झोपडीतील माणसाला शिक्षणाची गरज आहे कारण शिक्षणामुळे माणसाचा सर्वांगिण विकास होतो त्यामुळे शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे

# वाल्मिक कराडच्या पत्नीची मनोज जरांगेंना भावनिक साद, म्हणाल्या, मी सुद्धा मराठा, मलाही न्याय द्या




बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला कोर्टाने आज ७ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली. यानंतर वाल्मिक कराडची पत्नी मंजिली कराड यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. यावेळी त्यांनी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांना भावनिक साद घातली. तसेच त्यांनी भाजप आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचा उल्लेख करत त्यांची प्रकरणं समोर आणणार असल्याचा इशारा दिला.

ङवाल्मिक कराड यांच्या समर्थकांनी त्यांच्या प्रेमापोटी आपापल्या परिने आपापल्या ठिकाणी आंदोलन सुरु केलं आहे. आजची जी घडामोड आहे, तुम्ही ऐकलं असेल, न्यायव्यवस्थेवर तुमचा विश्वास असेल, तर न्यायालयाने सुद्धा त्यांना विचारलं आहे, न्यायाधीश सुरेखा पाटील यांनी सुद्धा तपास अधिका-यांना प्रश्न विचारला आहे की, एका फोन कॉलवर तुम्ही कलम ३०२ गुन्हा कसा दाखल करु शकता? त्यावर तुम्ही मकोका गुन्हा दाखल कसा करुन घेता?ङ्ग, असं मंजिली कराड म्हणाल्या.परवा जो स्टंटचा प्रकार झाला, मी काल ओरडून सांगितलं होतं की, न्यायव्यवस्था कुणाच्या तरी हाताम ध्ये बळी पडलेली आहे. हे आज जाणवलं आहे. फक्त एका स्टंटमुळे लोकांच्या चुकीच्या मागणीमुळे तुम्ही आज माझ्या माणसाला अडकलं आहे. आम्ही आमच्या न्याय व्यवस्थेनेच चालणार आहेत. तुम्ही कितीही अडकवण्याचा प्रयत्न केला तरी सत्य हे सम ोर येणारच आहे. तुम्ही तुमचा कितीही खेळ केला आहे, कारस्थानं करुन अडकलं आहे, ठिक आहे. तुम्ही अडकवा. जे काही पुरावे असतील, न्याय व्यवस्था न्याय दिल्याशिवाय राहणार नाही आणि माझा माणूस बाहेर आल्याशिवाय राहणार नाहीङ्ग, असं मंजिली कराड म्हणाल्या.

संतोष देशमुख सुद्धा माझा बांधव असल्यासारखाच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे न्याय मागितला. संतोष देशमुख सोबत जो कूकर्म झालं, तो सुद्धा माझा बांधव असल्यासारखाच आहे, त्याच्यासोबत जे कूकर्म झाले त्याला न्याय द्यायला आज जरांगे पाटील जातात. मग मला न्याय कोण देणार? आज माझ्या नव-यावर सुद्धा अन्याय झाला आहे. मी सुद्धा समाजाची एक घटक आहे. मी सुद्धा एक महिला आहे. मी महिला म्हणून माझ्या नव-यासाठी न्याय मागत आहे. मला न्याय कोण देणार आहे?ङ्ग, असा सवाल मंजिली कराड यांनी केला.

# विश्वास मुंडे IRS यांचे आयकर आयुक्त, पुणे या पदावर पदोन्नती

पुणे (प्रतिनिधी) परळीचे भूमिपुत्र तथा छत्रपती संभाजी नगर आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त विश्वास सोपानराव मुंडे खठड यांचे प्रमोशन होऊन आता आयकर आयुक्त, पुणे या पदावर नियुक्ती झाली आहे.आता पुण्याची नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे .

विश्वास मुंडे खठड बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील कनेरवाडी चे भूमिपुत्र आहेत. विश्वास मुंडे खठड यांचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्हेरवाडी ता. परळी वैंजनाथ, जिल्हा बीड येथे झाले व त्र्निरर्वीरींळेपःइ ढशलह



(लहशाळलरश्र) रासायनिक अभियांत्रिकी नागपूर येथे झाले आहे. णझडउ संपुर्ण देशात २२३ रॅक (बॅचः२००७ )भारतीय राजस्व सेवा (India Revenue service IRS> ) आता त्यांचे आयकर आयुक्त पुणे येथे प्रमोशन झाले आहे.

विश्वास मुंडे खठड यांनी सेवेत आल्यानंतर जळगाव, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, मुंबई आणि पुणे आयकर आयुक्त , पुणे या पदावर नियुक्ती झाली आहे संपूर्ण महाराष्ट्र भर ओळख आहे आयकर विभागात चोखपणे काम करून त्यांनी आपल्या याच कामातून कर्तव्यपणा सिद्ध करून दाखवला आहे. मागच्या काही महिन्यापूर्वी त्यांची छत्रपती संभाजीनगर आयकर विभागाच्या अतिरिक्त आयुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली होती .याही ठिकाणी त्यांनी अगदी चोखपणे कर्तव्य निभावले होते. आता त्यांच्यावर पुण्याची नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे पुणे येथे आयकर आयुक्त पदावर ते आता काम पाहणार आहेत त्यामुळे याही ठिकाणी अगदी चोखपणे ते कर्तव्य निभावतील असा विश्वास प्रत्येकाला आहे .त्यांची पुणे आयकर आयुक्त पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## आष्टीत जरांगे पाटील, खा.सोनवणे, आ.धस,आ.सोळंके, आ.क्षीरसागर यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक



आष्टी दि.१५ (बातमीदार): स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील, खा.बजरंग सोनवणे, आ.सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागर, आ.प्रकाश सोळंके यांच्या प्रतिमेवर जोडे मारो आंदोलन करून या नेत्यांची बदनामी केली असल्याने पुणे, बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणी या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून प्रत्युत्तर देण्यात आले आहे. काल परळी शहरात चौकशीअंती वाल्मिक कराड याला मकोका या कायद्यान्वये विशेष चौकशी समितीने ताब्यात घेतल्यामुळे वाल्मीक कराड समर्थकांकडून आरोपींच्या बाजूने आरोपीना शिक्षा व्हावी ही सतत मागणी करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त करत जोडे मारो आंदोलन केले आणि या व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून या सर्व नेत्यांची बदनामी केल्यामुळे स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व सर्वसामान्य लोकांच्या भावना दुखावल्या आहेत



## केवायसी झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान द्या, अन्यथा आंदोलन-भाई थावरे

माजलगाव दि.१५ (बातमीदार): तालुक्यातील शेतकरी आस्मानी, सुल्तांनी संकटामुळे मेटाकुटीस आला असुन सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीचे अनुदान जिल्हाधिकारी कार्यालयात पडुन आहे. तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांनी केवायसी केली असुन अद्यापही त्यांना पैसे मिळत नाहीत. त्यामुळे हे अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी नेते गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे. खरिप हंगाम २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने खरिप पिकांचे प्रचंड नुकसान होउन शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावुन घेतला. परिणामी उत्पन्नावर मोठा परिणाम झाला असुन अत्यल्प असे उत्पादन शेतकऱ्यांच्या हाती आले आहे. त्यातही शेतकऱ्यांच्या कापुस, सोयाबीनचे पडलेले दर मात्र जैसे थे असुन कापसाच्या हमीभाव देखील शंभर रूपयांनी कमी करण्यात आला

## माजलगाव शहरातील वाढीव घरपट्टी व नळपट्टी बाबत नागरिकांची मुख्याधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन पुढील दिशा ठरवणार - मोहनराव जगताप



माजलगाव (प्रतिनिधी) दि.१६ : माजलगाव शहरातील नागरिकांना नगरपालिकेने वाढीव घरपट्टी व नळपट्टी बाबत मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर आकारणी केली असून अनेक नागरिकांना घरपट्टीच्या पावत्या पाहून धक्का बसला याबाबत अनेक तक्रारी नगरपालिकेत देऊन काहीच उपयोग होत नसल्याने शहरातील नागरिकांनी एकत्र येऊन याबाबत माजी नगरसेवक शरद यादव यांच्या पुढाकारातून शरदचंद्रजी पवार पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांचे भेट घेऊन शहरातील नागरिकांची बैठक आयोजित केली या बैठकीत नागरिकांनी अनेक तक्रारी चा पाढा मोहनराव जगताप यांच्यासमोर वाचला. अनेक जणांना कनेक्शन नसताना नळाची बिले कमर्शियल रेसिडेन्शिअल दरामध्ये य मोठी तफावत मालमत्ता करामध्ये आढळून आल्याने नागरिकांनी सर्व तक्रारी मोहनराव जगताप यांना लेखी स्वरूपात दिल्या या सर्व तक्रारीचे दखल घेऊन मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क साधून मोहनराव जगताप यांनी दोन दिवसात नगरपालिकेत नागरिकांसोबत बैठक आयोजित करण्याची सूचना दिल्या सर्व समस्या त्यांच्यासमोर मांडून व नागरिकांच्या समस्यांचे निराकरण न झाल्यास याबाबत पुढील दिशा आपण ठरवू असं बैठकीमध्ये मोहनराव जगताप यांनी नागरिकांना आश्वासित केले. या बैठकीला शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते

# राज्यपाल दत्तक काजीपोड गावात पाच महिन्यांपासून आदिवासी समाजाची पाण्यासाठी भटकंती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड -किनवट : तालुक्यातील १०० टक्के आदिवासी असलेले जवरला गाव राज्यापालाने दत्तक घेतलेले आहे, या गावात आदिवासी कोलाम समाज आहे. राज्यपालांनी दत्तक घेतलेल्या जवरला गटग्रामपंचायत अंतर्गत काजीपोड गावात गेल्या पाच महिन्यांपासून निर्जळी आहे. पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या आदिवासी महिलांनी संताप व्यक्त करत जवरला ग्रामपंचायतीसमोर काल ठिय्या आंदोलन केले. आजही आदिवासी भागातील आदिवासी पाडे देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पुर्ण होऊनही पाण्याचा प्रश्न राज्यपालांनी दत्तक घेतलेल्या गावात निर्माण व्हावा, ही बाब चिंताजनक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी मजन मन योजनाफ केंद्र सरकारने सुरू केली असून त्यात आदिम जमातीच्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे स्वप्न त्यात




दाखविले आहे. राहण्यासाठी घर, वीज, रस्ते, शिक्षण व पाणी या मूलभूत गरजा त्यांना मिळाव्यात म्हणून कोट्यावधी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली पण मदिव्याखाली अंधारफ असा प्रकार किनवट या आदिवासी तालुक्यात घडत असून १०० टक्के आदिवासी असलेले कोलाम या आदिम जमातीचे काजीपोडीच्या नागरिकांना गेल्या चार पाच महिन्यापासून पाण्यासाठी भटकावे लागत आहे.कोलाम जमातीच्या महिलांनी जवरला येथील ग्राम पंचायतीसमोर ठिय्या आंदोलन केल्याने शासनाच्या योजना किती फोल ठरत आहेत, हे स्पष्ट झाले. या ठिय्या आंदोलनामुळे ग्राम पंचायततीचे धाबे दणाणले असून पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी ग्रामसेवकांची तारांबळ उडाली आहे. जवरला या राज्यपाल दत्तक ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या काजीपोड येथील कोलामांसाठी एक विहीर अधिग्रहण करण्यात आली असून या विहिरीवरुन पाणीपुरवठा होण्याऐवजी तांत्रिक कारण देऊन कोलामांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवले जात आहे. अनेकदा तक्रार करून सुद्धा या गंभीर प्रश्नी ग्रामसेवक व ग्रामपंचायतीचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे काजीपोड येथील त्रस्त महिलांनी संतप्त होऊन काल जवरला येथील ग्राम पंचायतीसमोर ठिय्या आंदोलन केले. राज्यपाल दत्तक गाव असल्याने जवारला गावाकडे गटविकास अधिकाऱ्यांपासून तर जिल्हाधिकाऱ्यापर्यंत सर्व उच्चस्तरीय अधिकाऱ्यांचे लक्ष असते. कालच्या या आंदोलनामुळे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.
००

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com